# जाहिरात नमुना सन २०२०-२१

# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे परिमंडळ, पुणे.

पुणे परिमंडळांतर्गत **पुणे मनपा, पिंपरी चिंचवड मनपा, प्राचार्य, आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, औंध व जिल्हा रुग्णालय, पुणे** करीता रिक्त पदांची भरती प्रक्रिया खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर पदभरती करणेसाठी खालील पदांसाठी पात्र उमेदवारांकडुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज **http://ddhspune.com/** या लिंकवरती मागविण्यात येत आहेत.

### पुणे महानगरपालिका, पुणे

| अ. क्र. | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी (पूर्णवेळ) | १८ | MBBS MCI/MMC कौन्सिल कडील नोंदणी आनिवार्य | रु. ६०,०००/- | अ.जा.- १, अ.ज. २, इमाव ४, भजब १, भजक १, खुला - ९ |
| २ | आरोग्य अधिपरिचारिका (Staff Nurse) | ५३ | 12th pass with GNM/B.Sc Nursing MNC कडील नोंदणी आनिवार्य | रु. २०,०००/- | अजा ४, अज ३, विजाअ २, भजब १, भजक १, विमाप्र २, इमाव १२, ईडब्ल्यूएस ९, खुला १९ |

### पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे

| अ. क्र. | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी (पूर्णवेळ) | ११ | MBBS MCI/MMC कौन्सिल कडील नोंदणी आनिवार्य | रु. ६००००/- | अ.जा.-१, अ.ज. १, विजाअ १, इमाव ३, खुला - ५ |
| २ | आरोग्य अधिपरिचारिका (Staff Nurse) | १५ | 12th pass with GNM/B.Sc Nursing MNC कडील नोंदणी आनिवार्य | रु.२०,०००/- | अजा १, अज १, विजाअ १, भजब १, भजक १, विमाप्र १, इमाव १, ईडब्ल्यूएस ४, खुला ४ |

### प्राचार्य, आरोग्य व कुटूंब कल्याण, औंध, पुणे

| अ. क्र. | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | अकौंटंट | २ | B.Com with Tally Certification, MSCIT | रु. १८,०००/- | अ.जा.-१, खुला १, |
| २ | वैद्यकीय अधिकारी (पूर्णवेळ) | १ | MBBS MCI/MMC कौन्सिल कडील नोंदणी आनिवार्य | रु. ६००००/- | खुला-१ |
| ३ | नर्सिंग अधिकारी | २ | BSC Nursing (MNC Certification) किमान ३ वर्ष अनुभव | रु. २५०००/- | खुला-१, इमाव १ |



Scanned with CamScanner

## जिल्हा रुग्णालय,पुणे (टेलिमेडिसीन हब)

| अ. क्र. | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी (पूर्णवेळ) | ३ | MBBS MCI/MMC कौन्सिल कडील नोंदणी आनिवार्य | रु. ६००००/- | खुला-१, इमाव १, ईडब्ल्यूएस १ |

**अटी व शर्ती :-**

१) इच्छुक उमेदवारांनी दि.१४/०१/२०२१ ते २२/०१/२०२१ रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावा. अर्जासोबत १) वयाचा पुरावा २) पदवी/पदवीका प्रमाणपत्र ३) शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका ४) रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (as applicable) ५) शासकिय/निमशासकिय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र ६) निवासी पुरावा ७) जातीचे प्रमाणपत्र ८) उमेदवाराचा सद्याचा पासपोर्ट साईजचा फोटोसह **PDF मध्ये स्कॅन करुन सोबत जोडलेल्या ऑनलाईन लिंक http://ddhspune.com/ मध्ये भरण्यात यावा.**

२) वैद्यकीय अधिकारी (पूर्णवेळ) या पदासाठी वयोमर्यादा ६५ वर्ष पर्यंत राहील. आरोग्य अधिपरिचारिका (Staff Nurse), अकौंटंट या पदासाठी वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष व इतर मागास वर्गासाठी ४३ वर्ष इतकी राहील.

३) उपरोक्त जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पदाकरीता अपेक्षित उमेदवार उपलब्ध न झाल्यास एन.एच.एम अंतर्गत व्यवस्थापनाकरीता सदरील पदे भरणे आवश्यक असल्याने उक्त शैक्षणिक अर्हताधारक शासकिय सेवानिवृत्त उमेदवार हे सदर पदाकरीता पात्र राहतील.

४) पदासमोर नमुद मानधन हे एकत्रित मानधन असुन त्या व्यतिरीक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाहीत.

५) ऑनलाईनद्वारे प्राप्त झालेल्या अर्जावरुन व उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेवरुन गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. मेरीट लिस्ट तयार करताना Qualifying Exam मध्ये मिळालेले गुण उच्च शैक्षणिक अर्हता व शासकीय/निमशासकीय कार्यालयाचा अनुभव या बाबींचे गुण एकत्र करुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येवुन संबंधित पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.

६) अर्जासोबत उमेदवारांनी परिक्षा शुल्क रक्कम रु.३००/- रुपयांचा डिमांड ड्राफट **Deputy Director Health Services Pune** यांच्या नावे पोस्टाने, कुरियरने व व्यक्तिशः मा. उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ३ रा मजला, एनएचएम विभाग, कौन्सिल हॉल समोर, पुणे १ येथे विहित मुदतीत सादर करावा. तसेच अर्ज ऑनलाईन भरताना डिमांड ड्राफटचा फोटो, बॅंकेचे नाव व डिमांड ड्राफ्टच्या मागच्या बाजूला कोणत्या जिल्हयाकरिता तसेच कोणत्या महानगरपालिका /कार्यालयाकरिता अर्ज केला आहे त्या जिल्हयाचे नाव, पदाचे नाव, अर्ज क्रमांक अचूक भरावा.

७) वरील जाहिरातीतील ज्या पदाकरिता अर्ज केला आहे त्याचे शुल्क भरावे लागेल जर उमेदवाराने वेगवेगळे अर्ज केले तर वेगळी परिक्षा शुल्क अदा करावा लागेल. उदा. पुणे मनपा कार्यालयासाठी वैद्यकीय अधिकारी या पदाकरिता अर्ज केला तर त्याचे परिक्षा शुल्क आणि पिंपरी चिंचवड कार्यालयातील वैद्यकीय अधिकारी या पदाकरिता परिक्षा शुल्क वेगळे अदा करावे लागेल. तसेच ज्या कार्यालयातील जाहिरातीकरिता अर्ज केला असेल त्याचे परिक्षा शुल्काची माहिती अर्जासोबत ऑनलाईन मध्ये भरावी याची नोंद घ्यावी.

८) सदरचे पदे ११ महिन्याच्या कंत्राटी तत्वावर भरण्यात येणार आहेत.

Scanned with CamScanner

९) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

१०) पुर्ननियुक्तीबाबत, शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणाबाबत उमेदवारांना कुठलाही दावा करता येणार नाही.

११) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही. नियुक्ती दिलेल्या उमेदवारांनी मुख्यालयी राहुन सेवा देणे बंधनकारक राहील.

१२) कोविड १९ या साथरोगाचा प्रादुर्भाव असल्याने राज्य आरोग्य सोसायटीने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणेच पदवीचे गुण तसेच शासकीय कामाचा अनुभव, पदवी, पदवीत्तर, व इतर शैक्षणिक अर्हता याचा विचार करुनच संवर्गाप्रमाणे गुणवत्ता यादी लावण्यात येणार आहे. भरती प्रक्रियेच्या दरम्यान वरिष्ठ कार्यालयामार्फत मुलाखत घेण्यात याव्यात असे आदेशित करण्यास आल्यास त्यावेळेसच मुलाखती व इतर प्रक्रिया पार पाडली जाईल याबद्यलचे सर्व अधिकार निवड समितीकडे असतील.

१३) अर्जदारांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना त्यांचा सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ईमेल आयडी अचुक नोंदवावा. तसेच ते भरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी

१४) भरतीप्रक्रिये दरम्यान उमेदवाराने चुकीची माहिती सादर केल्याचे, कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे, दबाब तंत्राचा वापर किंवा अनुचित मार्गाचा अवलंब केल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्प्यावर त्याची उमेदवारी/नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता रदद करण्यात येईल.

१५) भरती प्रक्रियेचे संपुर्ण अधिकार पदे कमी जास्त करणे, भरती प्रक्रिया रदद करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे,इ.सर्व अधिकार उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ पुणे यांनी राखुन ठेवले आहेत.

(स्वाक्षरीत /-)
उपसंचालक, आरोग्य सेवा,
पुणे परिमंडळ,पुणे



Scanned with CamScanner